**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद स्तरावर अंमलबजावणी करण्यात येणा-या योजनांना अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३/पापु-१९(शिकाना)**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: २८ मार्च, २०१८

वाचा

१) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च, २०१०
२) शासन निर्णय क्रमांक: ग्रापाधो-१११५/प्र.क्र.९२/पापु-०७, दिनांक ०७ मे, २०१६
३) शासन निर्णय क्रमांक: मुपयो-२०१६/प्र.क्र.८३/पापु-१९, दिनांक २५ जानेवारी २०१७
४) शासन निर्णय क्रमांक: मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३/पापु १९(शिकाना), दिनांक १५.०२.२०१८
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८.०४.२०१७
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३ दिनांक ३०.०६.२०१७

**प्रस्तावना:-**

राज्य शासनाचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षांच्या कालावधीत राज्यभरात राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने घ्यावयाच्या योजनांकरिता (लेखाशीर्ष क्र २२१५ ९९४२) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रुपये २२७.१३ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधीतून मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीकरिता संबंधीत जिल्हा परिषदांना अनुदान मंजूर व मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीकरिता संबंधीत जिल्हा परिषदांना या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रा मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. ५३११.१० लाख ( अक्षरी रुपये त्रेपन्न कोटी अकरा लाख दहा हजार फक्त ) इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BDS) खालील अटींच्या अधीन राहून मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

१) जिल्हा परिषदांनी सदर अनुदान मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मान्यता देण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणी करिताच खर्च करावे.

२) सदर निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातच खर्च होणे आवश्यक आहे. तो व्यपगत होणार नाही अथवा कोषागारातून आहरित करुन बँक खात्यात काढून ठेवला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३) जिल्हा परिषदांकडे वितरीत करण्यात आलेला निधी स्वीय प्रपंजी (PLA) किंवा अशा अन्य खात्या मध्ये ठेवण्यात येऊ नये.

४) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी मागणी करतांना चालू आर्थिक वर्षात वितरित करण्यात आलेला निधी, झालेला खर्च, शिल्लक निधी इत्यादी बाबतची माहिती सादर केल्याशिवाय भविष्यात निधी मंजूर केला जाणार नाही.

५) ज्या प्रयोजनासाठी निधी वितरित करण्यात आलेला आहे, त्याबाबतची भौतिक प्रगतीची माहिती संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या कडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख विहीत कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणा-या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे दर तीन महिन्यानी झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता नियंत्रक अधिका-याने घ्यावी.

६) जिल्हा परिषदांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत .या शासन निर्णयातील व दिनांक ७ मे,२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीची व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पूर्तता होत आहे, याची खात्री करुन घेता यावी, या साठी महालेखापाल, महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिका-यांना लेखा परिक्षणाकरिता संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहिल. तसेच महालेखापाल यांना त्यांचे काम योग्यरितीने पार पाडता यावे म्हणून संबंधीत अंमलबजावणी यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

७) अनुदानाच्या खर्चाचा अहवाल महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांनी कार्यासन पापु-१९/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर व पापू-१९ कार्यासनास सादर करावे.

८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४..२०१७ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच उक्त परिपत्रकान्वये आवश्यक असलेली प्रमाणपत्रे या विभागास सादर करण्यात यावीत.

२. याबाबतचा खर्च मागणी क्र. वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा , १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (२६) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम ( २२१५ ९९४२)- ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (दत्तमत) या लेखाशीर्षाखालील तरतुदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३० जुन, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी व परिशिष्टातील अ.क्र. ८ मधील अ.क्र. १ ते १० मधील आवश्यक त्या बाबींची पूर्तता होत आहे. परिशिष्टातील अ.क्र. १ ते ७ येथील अटींचा संबंध येत नाही.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१६३६५५९०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

K. J. Dhalape

Digitally signed by K. J. Dhalape
DN: CN = K. J. Dhalape, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply And Sanitation Department
Date: 2018.03.28 17:46:31 +05'30'

**(का.जा. धलपे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) महालेखापाल, महाराष्ट्र- १ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
५) अपर मुख्य सचिव, (पा.पु.व स्व.वि) यांचे स्वीय सहाय्यक ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
६) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (संबंधीत)
८) उपसचिव ( अर्थ संकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई, बेलापूर
१०) अधिदान व लेखा अधिकारी मुंबई ,
११) संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन ,बेलापूर, नवी मुंबई
१२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (संबंधीत)
१३) नियोजन विभाग, कार्यासन - १४४३/ वित्त विभाग कार्यासन - व्यय ३.
१४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.०४, पा.पु.२०.
१५) निवडनस्ती पापु-१९ कार्यासन

## ❦ विवरणपत्र ❦

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : मुपेयो-२०१७/प्र.क्र.१३/पापु-१९(शिकाना),
दिनांक २८ मार्च,२०१८ चे सहपत्र

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम लेखा शिर्ष क्रमांक (२२१५-९९४२)**

| अ.क्र. | जिल्हा परिषद | मंजुर योजना | मंजुर योजनांची किंमत (रु.लाखात) | यापुर्वी वितरीत रक्कम (रु.लाखात) | सन २०१७-१८ करिता वितरीत करण्यात येत असलेला निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | ९ | १२१२.४४ | ०.०० | ९७.३५ |
| २ | रत्नागिरी | २ | १९६.१५ | ०.०० | ५८.८५ |
| ३ | सिंधुदुर्ग | ७ | २८७.४४ | ०.०० | ८१.१६ |
| ४ | पुणे | ३ | १९७.४७ | ०.०० | १७५.५३ |
| ५ | सांगली | १९ | २७१७.७६ | २१४.९४ | ४००.५० |
| ६ | सोलापूर | १० | ४१२.८३ | ०.०० | ११६.८६ |
| ७ | कोल्हापूर | १२ | ११०४.४९ | १०८.५० | २८६.९२ |
| ८ | नंदुरबार | १० | ४४९.११ | ८६.८६ | १३४.७३ |
| ९ | जळगाव | ३५ | २०९९.१३ | ५८.४५ | २६५.६७ |
| १० | अहमदनगर | २१ | २१५९.७८ | ११७.७२ | ६१७.९२ |
| ११ | औरंगाबाद | १२ | १४२६.०५ | १४९.७४ | ४८१.८७ |
| १२ | जालना | ४९ | ३८५७.०३ | १५३.८४ | ९७१.७९ |
| १३ | हिंगोली | २ | २०४.१२ | ०.०० | २०.६२ |
| १४ | उस्मानाबाद | ४ | २४५.०६ | ०.०० | ७३.५२ |
| १५ | बीड | १५ | ११०५.९९ | ०.०० | ३३१.२० |
| १६ | अमरावती | ६ | ९०८.४१ | १२५.५१ | २५०.४९ |
| १७ | अकोला | १० | ६३४.५५ | ०.०० | १८९.१७ |
| १८ | वाशीम | ११ | ११००.४८ | ५५.६५ | १६१.३७ |
| १९ | नागपूर | ३९ | २५०१.३६ | ५१.४४ | २९१.३० |
| २० | वर्धा | ९ | ७९९.६८ | ०.०० | १०४.५३ |
| २१ | भंडारा | ७ | ४५५.४४ | १७.०५ | १३६.६३ |
| २२ | चंद्रपूर | ८ | ४३०.६४ | ०.०० | ६३.१२ |
| **एकुण ( रुपये लाखात )** | | | | **११३९.७** | **५३११.१** |

K. J. Dhalape

Digitally signed by K. J. Dhalape
DN: CN = K. J. Dhalape, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply And Sanitation Department
Date: 2018.03.28 17:46:57 +05'30'

**( का.जा.धलपे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**